नागपूर

# महासागर वृत्तसागर

■ शनिवार, दि. ३०, ऑगस्ट २०२५ ■


## कारने ड्रग्जची विक्री करणारा गजाआड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

शहरभरात कारने फिरून अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका आरोपीला गुन्हे शाखेच्या एनडीपीएस पथकाने सापळा रचून अटक केली. पोलिसांना त्याच्याजवळ ५५ ग्रॅम एमडी पावडर मिळाला. पोलिसांनी त्याच्याकडून कार आणि ड्रग्जसह एकूण ८९.३७ लाखांचा माल जप्त केला. सूरज भीम कोसरे (२४) रा. श्रावणनगर, वाठोडा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांकडून ऑपरेशन थंडर अंतर्गत सातत्याने अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू आहे. वाठोडा ठाण्यांतर्गत स्वामी नारायण मंदिरामागील श्रावणनगरात एक युवक अंमली पदार्थांची विक्री करीत असल्याची माहिती बुधवारी रात्री १० वाजताच्या सुमारास पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी त्याला पकडण्यासाठी परिसरात सापळा रचला. जय बजरंग किराणा स्टोअरजवळ पोलिसांना सूरज सांगण्यात आलेल्या नंबरच्या कारजवळ संशयितरित्या उभा दिसला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन पंचासमोर झडती घेतली असता एका जिपलॉक पिशवित ५५ ग्रॅम एमडी पावडर मिळाले. पोलिसांनी त्याच्याकडून ड्रग्ज, कार आणि मोबाईलसह एकूण ८९ लाख ३७ हजार रुपयांचा माल जप्त केला. चौकशीदरम्यान सूरजने सांगितले की, त्याला चैतन्यश्वरनगर परिसरात राहणारा आशिष दिलीप काळे (३२) नावाचा तरुण मालाचा पुरवठा करतो. तो आशिषसाठी कमिशनवर अंमली पदार्थ विकण्याचे काम करतो. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध वाठोडा ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

## थॅलेसिमीया-सिकलसेलबाबत जनजागृतीची गरज : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

थॅलेसिमिया व सिकलसेलमुळे लाखो लोकांचे जीवन संकटात आहे. त्यांच्यावर उपचाराची जेवढी गरज आहे, तेवढीच या आजाराबाबत समाजामध्ये जनजागृती होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

थॅलेसिमिया ॲंड सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेच्या वतीने एनरिको हाईट्स येथे आयोजित कार्यक्रमात नितीन गडकरी यांच्या हस्ते थॅलेसिमिया व सिकलसेल योद्ध्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार कृष्णा खोपडे, भाजप शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, सोसायटीचे अध्यक्ष डॉ. विंकी रुघवानी, बाल आयुष फाउंडेशनचे संचालक ललित परमार यांची प्रमुख उपस्थिती होती. गडकरी म्हणाले, पूर्व विदर्भात या आजाराने अनेक रुग्णांना ग्रासले आहे. उत्तर नागपुरात तर हजारो रुग्ण आहेत. यापूर्वी मुंबईतील कोकिलाबेन हॉस्पिटलमध्ये शंभर मुलांचे बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन झाले. ज्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली, ते आज आत्मविश्वासाने जीवन जगत आहेत. नागपुरात कायमस्वरुपी ही व्यवस्था असावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या आजारातून रुग्णांना मुक्ती देण्यासाठी पूर्ण शक्तीने प्रयत्न करेन, असा विश्वासही ना. गडकरी यांनी दिला. यावेळी ललित गजनाडे, वीरेंद्र ठवरे, स्मृती चोबीतकर, तितीक्षा उमाळे, नर्गिस अहमद, महेक, गिरीश डोंगरे, डॉ. क्षितिज सूर्यवंशी, इप्शिता शंभरकर, सौरभ वासेकर, सिद्धार्थ चहांदे, प्राजक्ता चौधरी, संजीवनी सातपुते, पंकज रुघवानी, संगीता रुघवानी, दीपांश रुघवानी, कमलजीत कौर या सिकलसेल योद्ध्यांचे सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणोती बागडे यांनी केले.




### थॅलेसिमिया व सिकलसेल योद्ध्यांचा सत्कार

### हां मै थॅलेसिमिया पेशंट हुं

बोन मॅरो ट्रान्सप्लान्टसाठी केलेल्या सहकार्याबद्दल रुग्णांनी गडकरी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तर त्याचवेळी तीतिक्षा उमाळे या सिकलसेलग्रस्त तरुणीने रुग्णांची व्यथा कवितेच्या माध्यमातून सकारात्मकरित्या मांडली. हां मै एक थॅलेसिमिया पेशंट हुं मैं असेही जीवन जिती हुं या तिच्या कवितेला उपस्थितांची दाद मिळाली. तर साहेब, आमच्या जीवनातील रस्ते पण चांगले बनवाल ना? अशी आर्त साद देणारी कविताही तिने सादर केली.

## प्रेमप्रकरणातून शाळकरी मुलीची निर्घृण हत्या



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गृह शहर नागपूर शुक्रवारी दुपारी (२९ ऑगस्ट २०२५) भीषण हत्याकांडाने हादरले. येथील अजनी परिसरातील गुलमोहर नगर परिसरात सोळा वर्षीय शाळकरी मुलीचा तिच्याच अल्पवयीन प्रियकराने चाकूने वार करत निर्घृण खून केला. शाळेजवळच घटना घडल्याने खळबळ उडाली. नागपुरातील कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या घटनेबाबत आपण जाणून घेऊ या.

सेंट अँथनी स्कूलमध्ये दहावीत शिकणारी एंजेल जॉन शुक्रवारी दुपारी शाळा सुटल्यानंतर बाहेर आली. याचवेळी इमामवाडा परिसरात राहणारा अल्पवयीन आरोपी तिच्या मागे आला. बोलण्याचे निमित्त करत अचानक त्याने एंजेलवर चाकूने हल्ला चढवला. पाहता पाहता एंजेल रक्ताच्या थारोळ्यात कोसळली. शाळा परिसरात ओरड ऐकून विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक धावून आले. प्राचार्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. गंभीर जखमी अवस्थेत एंजेलला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात (मेडिकल) दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तिचा आधीच मृत झाल्याचे घोषित केले.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार एंजेल आणि आरोपी यांची ओळख तीन वर्षांपासून होती. त्यांचे संबंध प्रेमात बदलले. परंतु गेल्या काही महिन्यांपासून आरोपीशी वाद झाल्याने एंजेलने बोलणे कमी केले. या दुराव्याचा राग मनात धरून आरोपीने अखेर तिचा जीव घेतल्याचा पोलिसांना संशय आहे.

घटनेनंतर आरोपी तिथून पसार झाला. अजनी पोलिस आणि गुन्हे शाखेच्या चमूने तातडीने घटनास्थली धाव घेत पाहणी केली. आरोपी अल्पवयीन असल्याने त्याचा मागोवा घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली असून सर्वत्र नाकाबंदी करण्यात आली आहे. दुपारी घडलेल्या या हत्याकांडामुळे गुलमोहर नगर परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पालकांतही संतापाची भावना व्यक्त होत आहे.

## परीक्षा केंद्रावर सापडला मुन्नाभाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

**भिंतीला चिकटवला होता मोबाईल**

छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी होणाऱ्या पदभरती परीक्षेत मुन्नाभाई स्टाईलमध्ये कॉपी करताना एका उमेदवाराला पकडण्यात आले. त्याच्याविरुद्ध वाडी ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. विलास भीमराव चंदेल (३०) रा. टाकळी कदीम, छत्रपती संभाजीनगर असे आरोपीचे नाव आहे. परीक्षा केंद्र प्रमुख डॉ. हर्षवर्धन खरतडे यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदभरती सुरू आहे. यासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना वाडी-एमआयडीसी टी पॉइंटवरील मॉर्डन कॉलेज सेंटर मिळाले होते. इतर उमेदवारांसोबत विलासही परीक्षा देण्यासाठी आला होता. त्याने कानात एक लहान इयरफोन लावलेला होता. मोबाईल सुरू करून खोलीजवळच भिंतीला चिकटवून ठेवला. परीक्षेदरम्यान निरीक्षक प्रियंका उके यांना त्याच्या हालचालींवर संशय आला. त्यांनी निरीक्षक चेतन गजभिये यांना माहिती दिली. चेतन तपासणीसाठी त्याच्याजवळ पोहोचताच त्याने इयरफोन काढून पायाखाली दाबला. मात्र झडतीदरम्यान तो इयरफोन मिळाला. डॉ. खरताडे हे नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सहायक प्राध्यापक आहेत. त्यांना परीक्षा प्रमुख नियुक्त करण्यात आले होते. माहिती मिळताच खरतडे यांनी तत्काळ पोलिसांना सूचना दिली. पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## विदुषी परवीन सुलताना यांचे शास्त्रीय गायन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

भारतीय शास्त्रीय संगीत, संस्कृतीचा युवा वर्गात प्रचार-प्रसार करण्याच्या हेतूने कार्यरत भारतीय संगीत संस्था स्पिक मॅकेतर्फे शनिवार, 30 ऑगस्ट रोजी सायंकाळी 6.30 वाजता सुप्रसिध्द शास्त्रीय गायिका पद्मभूषण बेगम परवीन सुलताना यांचा गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या प्रसंगी व्हीएनआयटी कॉलेजमध्ये स्पीक मॅकेच्या चॅप्टरचा तसेच, हेरिटेज क्लबचा प्रारंभ करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रो. अघ्या मित्रा, प्रो. सारिका, सब्यासाची डे तसेच स्पिक मॅकेचे पदाधिकारी डॉ. निशा कुलकर्णी. रवी सातफळे, माया मुखर्जी, आभा पाराशर यांचे सहकार्य लाभत आहे.

## महादूला हद्दीत भारत सेलिब्रेशन जवळ अपघातात वृध्द व्यक्ती ठार

■ महासागर प्रतिनिधी, कोराडी, दि. २९ :

आज दुपारी 3 वाजता सावनेर कडून वेगाने येणारी पल्सर आणि हायवे ओलांडून जाणारे पादचारी यात धडक होऊन माणिक छोटेलाल मुक्सावार वय 65 रा. चनकापूर यांचा जागीच मृत्यू झाला. त्याच्या समवेत असणाऱ्या त्यांच्या पत्नी लक्ष्मी मुक्सावार वय 55 यांच्या डोक्याला गंभीर जखम झाली आहे. सदर घटना दुपारी 3 वाजता भारत सेलिब्रेशन आणि साहू रेस्टॉरंट च्या मुख्य महामार्ग 69ओलांडताना घडली. वयोवृध्द दाम्पत्य काही कामानिमित्त कोराडी बैंकेत आलेले होते, काम आटोपून घाईघाईने रोड क्रॉस करतांना घटना घडली. पल्सर वाहन चालक राकेश तुकाराम मुल्लवार वय 28 हा वेगाने सावनेर कडून येत असताना रोडच्या मध्यभागी माणिक आणि त्याची पत्नी एकमेकांचा हात धरून जात असताना पल्सर ने त्यांना धडक देताच माणिक सह त्यांची पत्नी दूर फेकल्या गेले त्यात माणिकचा जागीच मृत्यू झाला आणि त्यांची पत्नी लक्ष्मी यांना डोक्याला जबर इजा झाली. पी. आय.पोपट घायतोंडे, पी.एस.आय. महेंद्र चोपडे, चिंतामण डाखोल आणि बीट मार्शल यांनी तातडीने मृतक, जखमी आणि पल्सर चालकास मेयो रुग्णालयात दाखल केले.



## भक्ति आणि आरोग्याचा समतोल हाच जीवनातील खरी यशस्विता : डॉ. डबली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधि विभागात डॉ. ए. के. डोरले ऑडिटोरियममध्ये सर्वज्ञ 2025 अंतर्गत गणेशोत्सवाचे भव्य उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नॅचुरोपॅथी व नियोग तज्ञ डॉ. प्रवीण डबली तसेच पंढरपूर वारी करून परतलेले काटोलचे वारकरी विजय डोंगरे महाराज उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रा. डॉ. दादासाहेब कोकरे, डॉ. राजेंद्र काकडे (विभागप्रमुख), डॉ. प्रकाश इटनकर (पीएसए शिक्षक प्रभारी), ओम मेंढे (गणेशोत्सव महासचिव), आशीष अंबुले (फार्मसी स्टुडंट असोसिएशन अध्यक्ष), योगेश निकम व धनंजय गिराम यांच्यासह मोठ्या संख्येने बी.फार्म, एम.फार्म व पीएच.डी. विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात बी.फार्म विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भक्त पुंडलिकाच्या कथानकावरील नाट्यप्रस्तुतीने झाली. या प्रस्तुतीतून आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही पालकांचा सन्मान व ईश्वरभक्ती सर्वोपरी असल्याचा संदेश देण्यात आला. विजय डोंगरे महाराज यांनी वारी परंपरा व पांडुरंग भक्तीवर प्रकाश टाकताना सांगितले की विज्ञान आणि अध्यात्माचा संगमच जीवनाला योग्य दिशा देतो.

मुख्य अतिथी डॉ. प्रवीण डबली यांनी आपल्या प्रेरक मार्गदर्शनात अभंग परंपरा व गणपती बाप्पाचे स्वरूप आरोग्याशी जोडून स्पष्ट केले की भक्ति आणि आरोग्याचा समतोल हाच जीवनातील खरी यशस्विता आहे. वारकरी परंपरेतील अभंग हे केवळ श्रद्धेचे गीते नसून शरीर आणि मनाला संतुलन देणारे अमृत स्वर आहेत. त्यांनी सांगितले की वारकरी सामूहिकरीत्या विठ्ठल-विठ्ठल नामस्मरण करताना रीढ सरळ, चाल संतुलित आणि श्वास लयबद्ध ठेवतात. हे योग्य पोस्चरचे आदर्श उदाहरण आहे. डॉ. डबली यांनी पुढे सांगितले की जसे अभंगात स्वर, ताल आणि लय यांचा समतोल असतो तसेच आपल्या आसन व जीवनशैलीत संतुलन आणणे आवश्यक आहे.




## रक्तदान शिबिरांच्या आयोजनातून श्री गणरायाची आराधना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

नागपूर शहरामध्ये आरोग्यदायी कार्यामधून अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे श्री गणरायाची आराधना करीत आहेत. नागपूर महानगरपालिका आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन तसेच मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष द्वारे आरोग्य श्रीगणेशा अभियानामार्फत राबविण्यात येत असलेल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी अनेक गणेशोत्सव मंडळ पुढाकार घेत आहेत. मनपाद्वारे करण्यात येत असलेल्या रक्तदान शिबिर आयोजनाच्या आवाहनाला अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी साद दिली आहे. या कार्यात मनपाचे कर्मचारी देखील योगदान देत असून, मनपाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्यसाधून मंगळवारी २ सप्टेंबर २०२५ रोजी मनपा मुख्यालयामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

गणेशोत्सवानिमित्त नागपूर शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याबाबत नागपूर महानगरपालिका आरोग्य विभाग आणि जिल्हा प्रशासनाद्वारे आवाहन करण्यात आले. याशिवाय मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष द्वारे आरोग्य श्रीगणेशा अभियानामार्फत देखील आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या निर्देशांनुसार अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांच्या नेतृत्वात गणेशोत्सव मंडळांनी रक्तदान शिबिराचे आयोजन करावे यासाठी गणेशोत्सव मंडळांना सहकार्य केले जात आहे.

मनपा पॅनल मधील रक्तपेढी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, डागा येथील रक्तपेढी आणि शहरातील इतर खासगी रक्तपेढीच्या सहकार्याने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये रक्तदान शिबिर राबविण्यात येत आहेत. नागपूर शहरात उपचार घेणाऱ्या गरजू रुग्णांना रक्ताचा तुटवडा भासू नये याकरिता हे रक्तदान शिबिर महत्वाचे ठरणार आहेत. गणेश मंडळांमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याबाबत मनपामध्ये बैठक देखील घेण्यात आली होती. या बैठकीच्या अनुषंगाने मनपाच्या सर्व झोनल वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या समन्वयामधून विविध रक्तपेढी च्या सहकार्यातून गणेश मंडळांमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहेत. शुक्रवारी मनपाच्या मेहंदीबाग आणि हनुमान नगर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून विविध गणेश मंडळांमध्ये आयोजित रक्तदान शिबिरामधून ८९ युनिट रक्त संकलन करण्यात आले आहे.




## आरोपी रवी मेंढेच्या जामीनावर आज सुनावणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

एका नामांकित महाविद्यालयातील प्राध्यापिकेच्या विनयभंग प्रकरणातील आरोपी रवी मेंढे आणि अरुण जोसेफ यांच्या अटकपूर्व जामीनावर शनिवारी सुनावणी होणार आहे. न्यायालयाने दोन्ही पक्षांची बाजू ऐकून घेतल्यानंतर निर्णय राखून ठेवला होता. मात्र, या प्रकरणावर आता शनिवारी न्यायालयात सुनावणी घेण्यात येणार आहे. मागील आठवड्यात न्यायालयाने आरोपी रवी मेंढे याला अंतरिम जामीन मंजूर केला होता. एका प्राध्यापिकेला शारीरिक संबंध आणि अन्य मागणी करीत तिचा विनयभंग केल्याची तक्रार आरोपी रवी मेंढे याच्यावर बजाजनगर पोलिस ठाण्यात दाखल केली होती. 23 जुलै 2025 रोजी रवी मेंढे याने त्यांच्यासोबत गैरकृत्य केले, असा आरोप करण्यात आला आहे. तसेच अन्य आरोपी अरुण जोसेफ याच्यावर विनयभंग केल्याचा गुन्हा दाखल आहे. रवी मेंढे यांच्यार्ते ॲड. मनोज कारिया,अरूण जोसेफ यांच्यार्ते ॲड. रोहन मालवीय यांनी बाजू मांडली. उद्या शनिवारी जामीन अर्जावर सुनावणी होणार आहे.

## महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानाची जागतिक दखल

### इंग्लंडच्या वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स पुरस्काराने सन्मान



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

शून्य विद्युत अपघात जनजागृती अभियानातील विक्रमी लोकसहभागाची जागतिकस्तरावर नोंद घेत इंग्लंडमधील वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स पुरस्काराने महावितरणचा सन्मान करण्यात आला. या अभियानाचे मार्गदर्शक आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र तसेच अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनाही आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्राने गौरविण्यात आले.

मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह महावितरणच्या वतीने संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार आणि विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी स्वीकारले. यावेळी प्रख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ. दिवाकर सुकुल (लंडन), प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. मधू कृष्णन (अमेरिका), ज्येष्ठ संपादक व माजी मंत्री राजेंद्र दर्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराच्या निवड समितीकडून महावितरणच्या विद्युत सुरक्षेच्या लोकाभिमुख अभियानाचे कौतुक करण्यात आले. यामध्ये वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे अध्यक्ष हेनरी आर (युरोप), प्रमुख पाब्लो (इंग्लंड), उपाध्यक्ष संजय पंजवानी, परीक्षक चंद्रशेखर शिंदे यांचा समावेश आहे.

महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील विक्रमी लोकसहभागाची दखल जागतिकस्तरावर घेण्यात आल्याबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे छोटेखानी बैठकीत कौतुक केले. शून्य विद्युत अपघाताचे उद्दिष्ट हे महावितरणच्या कामाचा दैनंदिन भाग आहे. विविध उपक्रम व कार्यक्रमांद्वारे सातत्याने लोकसंवाद साधून विद्युत सुरक्षेची माहिती देत राहावी असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक परेश भागवत, मुख्य महाव्यवस्थापक भूषण कुलकर्णी, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांची उपस्थिती होती.

वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स ही इंग्लंडमधील जागतिकस्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे. या संस्थेने महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभाग आंतरराष्ट्रीय विक्रम असल्याची घोषणा केली व मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार प्रदान केला. यावेळी युनायटेड किंग्डम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, नेपाळ आणि भारतातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

महावितरणने यंदा 20 व्या वर्धापन दिनानिमित्त दि. 1 ते 6जून दरम्यान विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये तब्बल 2 लाख 11 हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. यासह 1 कोटी 92 लाख 79 हजार ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएसद्वारे तर 35 लाख 73 हजारांवर ग्राहकांना नोंदणीकृत इमेलद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला. या अभियानातील लोकसहभागाच्या पाच विक्रमांसाठी महावितरणला एशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थांनी नुकतेच गौरविले आहे.

## उमा-गणेश स्मृती पुरस्कार वितरण सोहळा आज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

विदर्भ गौरव प्रतिष्ठानच्या वतीने उत्तम नट, नेपथ्यकार, प्रकाश योजनाकार, दिग्दर्शक स्व. गणेश नायडू व त्यांच्या पत्नी उमा नायडू यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा "उमा-गणेश स्मृती पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, ३० ऑगस्ट रोजी सायं. ५.०० वाजता महाराष्ट्र राष्ट्रभाषा संकुलातील श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. प्रसिध्द प्रकाश योजनाकार शिवशंकर माळोदे यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. एकवीस हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

महाराष्ट्र टाईम्सचे निवासी संपादक श्रीपाद अपराजित यांचा हस्ते व प्रसिद्ध दिग्दर्शक हरीश इथापे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी राहतील. या कार्यक्रमाला नाट्यकर्मी व अन्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# चाचेर ग्रामसभेत सरपंचांविरुद्ध नागरिकांचा रोष

## सरपंचाने सासरे व दिराच्या नावाने काढले पैसे

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. २९ :

गावात चांगले काम व्हावीत गावातील लोकांच्या मागणीनुसार जर कामे व्यवस्थित झालीत तर त्याठिकाणी त्या ग्रामपंचायतीच्या सरपंचांना चांगले काम केल्याने त्याला कौतुकाची थाप द्यावी लागते. एखाद्या सरपंचाने गावाच्या विकासासाठी चांगली भूमिका बजावली तर नक्कीच त्या व्यक्तीचा कार्यकाळ पाच वर्ष चांगला जातो. किंव्हा एखाद्या ग्रामपंचायतला भ्रष्टाचाराचा सुरुंग लागला की त्या सरपंचाला पाच वर्षानंतर मतदार जनता चांगलाच धडा शिकविल्याशिवाय राहत नाहीत. असाच प्रकार तालुक्यातील चाचेर येथील ग्रामपंचायत मध्ये दिसून आल्याने याची चर्चा चांगलीच तालुक्यात रंगत आहे. ग्रामपंचायत कार्यालय चाचेर येथे दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी होणारी ग्रामसभा तहकूब करून अचानक रात्री उशिरा (२४ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजता) दवंडी देत दिनांक २५ ऑगस्ट रोजी ग्रामसभा घेण्यात आली. अचानक बोलावलेल्या या ग्रामसभेमुळे नागरिकांत नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. या ग्रामपंचायतला भ्रष्टाचाराची कीड लागली की काय असाही प्रश्न उपस्थित होत आहे,



> चाचेर येथील ग्रामपंचायत अंतर्गत केलेले काम नियमानुसार व प्रामाणिक पणे झाले असून गावातील काही नागरिकांनी हे काम जेसीबीच्या सहाय्याने केले असून हे बिल जेसीबीच्याच नावाने काढा असा तगादा लावला परंतु काम जरी जेसीबीच्या सहाय्याने झाले असले तरी नियमानुसार जेसीबीच्या नावाने आपल्याला पैसे काढता येत नाही त्यासाठी हे बिल लेबर नुसार काढण्यात यावे यासाठी मला सरपंच यांनी गावातीलच 8 लोकांचे अकाऊंट नंबर पाठविले होते. त्यानुसार आपण त्यांच्या खात्यावर पैसे टाकले आहेत.
>
> **सुरेश कोडापे, ग्रामधिकारी चाचेर**

चाचेर येथे ग्रामसभेत वार्ड क्र. ४ मधील भूमिगत नालीच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. सदर काम अंदाजे ८०% पूर्ण झालेले असले तरी पंचायत समितीकडून तांत्रिक मान्यता (ळ.र) न घेता काम सुरू करण्यात आले आहे. विशेष म्हणजे हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यालगत करण्यात आले असून, विभागाशी कुठलाही प्रकारचा पत्रव्यवहार न करता काम पार पडल्याची माहिती ग्रामसभेत देण्यात आली. हा प्रकार नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर एकच गोंधळ घातला होता. याठिकाणी जनतेच्या पैशाचा वापर बरोबर होत नसेल तर येथील सरपंच कोणत्या कामाचे अशी चर्चा दिसून आली.

गावातीलच सुरू असलेल्या कामात जेसीबीचा वापर करण्यात आला, परंतु या कामासाठी लेबर दाखवून मजुरीची रक्कम सरपंचांच्या सासरे, दिर तसेच काही नागरिकांच्या नावाने काढल्याचा आरोप ग्रामसभेत झाला. कुठल्याच मजुराच्या सहाय्याने काम न करता मजुरी दाखवून का म्हणून पैसे काढले. जसे पैसे मजुराच्या नावाने काढले मग ही काम मजुरानेच करायला पाहिजे होते. तसे न करता हे काम जेसीबीच्या सहाय्याने करून त्या केलेल्या कामाची रक्कम मजुरीच्या सहाय्याने काढल्याचे दिसून आले. यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला असून ग्रामपंचायतीच्या कारभाराविषयी गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. गावातील अनेक लोक मोलमजुरी करून ग्रामपंचायतचे टॅक्स भरतात त्या पैशाचा दुरुपयोग होत असल्याचे काहींच्या लक्षात येताच काहींनी ग्रामसभेत बोलले असता त्यांना बरोबर उत्तर देण्यात आले नाही. मग हा भष्टाचार ग्रामस्थांच्या लक्षात आला असून ग्रामस्थांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला असून ग्रामपंचायतीच्या कारभाराविषयी गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. याची वरिष्ठांनी तात्काळ चौकशी करून कार्यवाही करावी अन्याय जनता रस्त्यावर उरल्याशिवाय राहणार नाही असे जनतेमध्ये बोलल्या जात आहे.

# न्यू मंगलधाम सोसायटी तान्हा पोळा उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २९ :

दत्तवाडी येथील न्यू मंगलधाम सोसायटी मध्ये बच्चे कंपनीसाठी तान्ह्या पोळ्याचे आयोजन सार्वजनिक शिवमंदीर ट्रस्टचे अध्यक्ष कमल कनोजे यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी विधीवत नंदीची पूजा अर्चना करून बच्चे कंपनीला विविध प्रकारच्या भेट वस्तू प्रदान करण्यात आल्या. कार्यक्रमाला कमल कनोजे, कैलास अडले, राजू शिवनकर, विक्रम तिजारे, सतीश नंदनकर, सुकलाल पटले, राकेश शिवणकर, अनिल घागरे, श्रावण गाखरे, पुरणलाल परिहार, कोठीराम तराटकर, तिलकचंद हरीणखेडे, अमोल मेश्राम, राजेश राहांगडाले, प्रमोद राऊत, सचिन कुलथे, घनश्याम ब्रम्हे, विनोद घोडे, गोलू गाकरे, प्रवीण राऊत, चंदू वैद्य, अरविंद शाहू, भारत चाटे, प्रदीप ठाकरे, आयोध्या प्रसाद शाहू, तेजस रहांगडाले, घाटोळे उपस्थित होते.

# फेटरीत तान्हा पोळ्यात बक्षीसाची लयलुट



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २९ :

फेटरी येथील वार्ड क्रमांक १ मधील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर प्रांगण,वार्ड क्रमांक २मधील, श्री दत्त देवस्थान मंदिर प्रांगण,वार्ड क्रमांक ३ मधील दुर्गा माता मंदिर प्रांगणातील तान्हा पोळा उत्सव मोठया प्रमाणात साजरा करण्यात आला.

ग्रामपंचायततर्फे तीनही वार्डांत नंदी सजावट स्पर्धा घेण्यात आली. यात प्रथम पारितोषिक १००१ रुपये,द्वितीय पारितोषिक ५०० रुपये व तृतीय पारितोषिक देण्यात आले. लहान मुलांनी आपापले नंदी आकर्षक पद्धतीने सजवून आणले होते. तसेच बालगोपालांनी विविध वेशभूषा परिधान करून पोळ्याला विशेष आकर्षण प्राप्त करून दिले.

या उत्सवाला सरपंच रवींद्र खांबलकर, उपसरपंच मुकेश ढोमणे, ग्रा.पं.सदस्य वकील डोंगरे, माजी उपसरपंच मृणाली दोडेवार, आशिष गणोरकर, वैशाली लंगडे, जितेंद्र पवार, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष राहुल शास्त्री, मेंगर , गंगाधर घोरमाडे, अमोल कुरळकर, रमेश बाबा उपस्थित होते.आयोजनासाठी ग्रामपंचायत कर्मचारी देवानंद ताजने व कमलेश वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

# रेल्वे स्थानकांवर सुरक्षा तपासणी वाढ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

दहा दिवसाच्या गणपती उत्सवामुळे नागपूर रेल्वेस्थानकावर प्रवाशांची गर्दी वाढली आहे. मुख्यतः सणासुदीच्या काळात मध्यवर्ती रेल्वे स्थानकावरील गर्दी लक्षात घेता रेल्वे पोलिस (जीआरपी) आणि रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) यांनी सर्व रेल्वे स्थानकांवर सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. मध्यवर्ती रेल्वेस्थानक असल्याने रेल्वे प्रशासनाला सावध राहणे आवश्यक झाले आहे. प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून जीआरपी, आरपीएफने प्लॅटफॉर्म आणि प्रवेशद्वारांवर अतिरिक्त सुरक्षा कर्मचारी तैनात केले आहे. याशिवाय रेल्वेच्या दोन्ही बॅग तपासणी केली जात असल्याची माहिती वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त मनोज कुमार यांनी दिली.

# राज्यस्तरीय स्पर्धेत फिटनेस मेनियाची बाजी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

सुयोग नगर येथील फिटनेस मेनिया हेल्थ क्लबच्या खेळाडूंनी नागपूरमध्ये पार पडलेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत जबरदस्त कामगिरी करत एकूण २२ पदकं पटकावली. २१ ते २३ ऑगस्टदरम्यान सिव्हिल लाईन येथील टछअ होस्टेलमध्ये ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत १६८ हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. क्लबच्या आर्या चौधरी हिने टिन गर्ल ऑफ महाराष्ट्र हा सन्मान पटकावत गोल्ड जिंकला. रुद्र आनंद भारती, करण पागोरे, हिमाशी बोरकुटे, पार्थ उज्जैनकर, श्रुती वरखडे यांनी सुवर्णपदक मिळवत संघाचे नाव उज्वल केले.करण पागोरेने फुल पॉवर लिफ्टमध्ये गोल्ड, बेंच प्रेसमध्ये सिल्व्हर, आणि डेडलिफ्टमध्ये गोल्ड पटकावले.इतर अनेक खेळाडूंनी सिल्व्हर व ब्रॉंझ पदकं जिंकून संघाचे यश अधिक बळकट केले.




या यशामुळे फिटनेस मेनियाच्या खेळाडूंना आता राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे, ही बाब नक्कीच अभिमानास्पद आहे. या यशामागे प्रशिक्षक महेश गायकवाड व अंकुश बोटरे यांचे कौशल्यपूर्ण मार्गदर्शन, तसेच टीम मॅनेजर अंशू लाडे यांचे व्यवस्थापन महत्त्वाचे ठरले.क्लबचे संचालक युवराज पागोरे व सुरेखा पागोरे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी ऑनलाईन वसतीगृह प्रवेश प्रक्रियेचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह, शासकीय निवासी शाळा चालविली जातात. मागासवर्गीयांची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नती तसेच त्यांचे राहणीमान, समाजातील इतर घटकांप्रमाणे त्यांना जीवन जगता यावे तसेच, त्यांना सर्व प्रकारचे शिक्षण व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने शासकीय वसतीगृह योजना सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत शासकीय वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना निवासाची व भोजनाची मोफत व्यवस्था, क्रमिक पुस्तके, वह्या व इतर शैक्षणिक साहित्य इत्याही सोयी सुविधा पुरविण्यात येते.

सामाजिक न्याय विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर या कार्यालयाच्या अधिनस्त नागपूर जिल्ह्यात शहरी भागात मागासवर्गीय मुलामुलींसाठी एकूण १४ वसतीगृहे तसेच तालुका स्तरावर मागासवर्गीय मुलामुलींसाठी एकूण ११ असे एकूण २५ शासकीय वसतीगृह नागपूर जिल्ह्यात कार्यान्वित आहेत. सदर वसतीगृहाच्या प्रवेशाबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे. सन २०२५-२६ या वषार्साठीचे शासकीय वसतीगृह प्रवेशाच्या सर्व अभ्यासक्रमाचे वसतीगृह प्रवेशाचे अर्ज ऑनलाईन पोर्टलव्दारे दिनांक १५ जुन २०२५ पासुन स्विकारणे सुरु झालेले आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचे व्यावसायिक अभ्यासक्रमाचे वसतीगृह प्रवेशाचे अर्ज पोर्टलव्दारे अर्ज स्विकारण्याचे व याद्या अंतिम करणेबाबतचे वेळापत्रक प्राप्त झालेले आहे. तरी विहीत दिनांकापर्यंत नागपूर जिल्हातील वसतीगृहासाठी पात्र असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी त्वरित ऑनलाईन अर्ज भरण्याची कार्यवाही करण्याचे जाहीर आवाहन मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर करित आहेत. वसतीगृह प्रवेशासंबंधी अधिक माहीतीसाठी संबंधित शासकीय वसतीगृहाचे गृहपाल किंवा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर या कार्यालयाशी संपर्क करावा.

# हावरापेठेत श्रींचा संजीवन समाधी सोहळा उत्सव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

हावरापेठेतील श्रीधर लांडे यांच्या निवासस्थानी संत गजानन महाराज संजीवन समाधी दिन मोठ्या श्रद्धाभक्तीने साजरा करण्यात आला. या सोहळ्यात पहाटे ५ वाजता श्रींच्या मूर्तीचे मंगलस्नान, पाद्यपूजा, पंचसूत्काभिषेक, तसेच आकर्षक फुलांनी सजवलेली मूर्ती यांचे पूजन आणि आरती श्रीधर लांडे व प्रणिशा लांडे यांच्या हस्ते करण्यात आली. दुपारी पारायण, भजनसंध्या, आणि बालगोपालांच्या हस्ते दहीहंडी फोडून गोपालकाला वितरण करण्यात आले. रात्री ७ वाजता महाआरती गौरी लांडे व गायत्री लांडे यांच्या हस्ते पार पडली. त्यानंतर सर्व भाविकांना प्रसाद वितरण करण्यात आले.या प्रसंगी दिनेश बांगडे, मंगेश मोरे, सचिन शास्त्रकार, भाऊराव लांडे, तसेच इतर अनेक मान्यवर व भक्त उपस्थित होते.

# शस्त्राच्या धाकावर हैदोस, गुंडास अटक

**नागपूर :** शस्त्राचा धाक दाखवून परिसरात हैदोस घालत असलेल्या गुंडास गस्तीवर निघालेल्या कोतवाली पोलिसांच्या पथकाने अटक केली. नरेश सीताराम सोनावणे (५८) रा. लाकडीपुलाजवळ, कोतवाली असे अटकेतील गुंडाचे नाव आहे. मध्यरात्रीच्या सुमारास कोतवाली पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान लाकडीपुलाजवळ एक असामाजिकतत्व गोंधळ घालत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारावर पोलिस परिसरात पोहोचले असता नरेश आरडा-ओरड करताना दिसला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता चाकू मिळाला. पोलिसांनी चाकू जप्त करून नरेशला अटक केली. त्याच्याविरुद्ध आर्म्स ॲक्ट व मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदविला आहे. तो काहीतरी मोठा गुन्हा करण्याच्या उद्देशाने परिसरात शस्त्रासह गोंधळ घालत असल्याचा संशय असल्याने पोलिस त्या दिशेने त्याची चौकशी करीत आहेत.

# नेहरू प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत तान्हा पोळा उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २९ :

येथील जवाहरलाल नेहरू प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत तान्हा पोळा मुख्याध्यापक विनोद देऊळकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. सहभागी विद्यार्थ्यांचे परीक्षकांच्या हस्ते परीक्षण करून प्रथम तीन विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्यात आली. व तीन प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. विद्यार्थ्यांचा शेतकऱ्यांच्या वेशभूषेत असलेला पेहराव आकर्षक ठरला. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते फोटोचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. सर्व




छोट्या मुलांनी शेतकऱ्यांना साजेशी परंपरागत वेशभूषा करून बैल सजवून आणले होते. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका भारती तातोडे यांनी तर आभार शिक्षिका विमल टेकाडे यांनी मानले.आयोजनासाठी शिक्षक धनंजय जोगी , विमल टेकाडे भारती तातोडे यांनी सहकार्य केले.

# शालांतपूर्व शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत शालांतपूर्व शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सन २०२५-२६ या शैक्षणिक वषार्पासून महाडीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन शिष्यवृत्ती राबविण्यात आली आहे. शालांतपूर्व शिष्यवृत्ती योजना ही जिल्हा दिव्यांग सक्षमिकरण अधिकारी, नागपूर मार्फत राबविण्यात येत आहे. सदरहु शिष्यवृत्ती योजना ही सन २०२४-२५ मध्ये माहे जानेवारी-२०२५ या वित्तिय वषार्पासून ऑनलाईन करण्यात आलेली आहे.

# पार्श्वनाथ पब्लिक स्कूलमध्ये तान्हा पोळा उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २९ :

द्रुगधामना येथील पार्श्वनाथ पब्लिक स्कूलमध्ये तान्हा पोळा उत्साहात साजरा करण्यात आला.शेतकरी वेशभूषेत सजलेले विद्यार्थी आणि सुंदर सजवलेले लाकडी बैल हे आकर्षणाचे केंद्र ठरले. सर्वप्रथम शाळेच्या प्राचार्या अन्नु पाल यांनी नंदीपूजन करून बैलांचे महत्त्व सांगितले.तसेच बैलपोळ्याचा उद्देश विद्यार्थ्यांना समजावून दिला. ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देणे व शेतकऱ्यांच्या जीवनातील बैलांचे महत्त्व समजावून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे संचालक उदय टेकाडे यांनी प्रास्ताविकतेमधुन सांगीतले.

विद्यार्थ्यांनी लाकडी बैलांची सजावट तसेच सूचना फलक तयार करून जनजागृतीचा संदेश दिला. शेतकरी आत्महत्या, झाडे लावाझाडे जगवा, प्राणी संरक्षण यांसारख्या संवेदनशील विषयांवर फलकांद्वारे सामाजिक संदेश दिला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी ग्रामीण व सांस्कृतिक वारसा जपण्याबरोबरच निसर्ग संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले.

वेशभूषा स्पर्धेत इवांशिका सोनुले, हर्षा भावना, निहारवी श्रीवास्तव, धनेश गुरपुडे व अंशी बोरकर यांनी पारितोषिक मिळवले.

# विद्यार्थ्यांनी उपस्थिती अहवाल १० सप्टेंबरपर्यंत सादर करावा

**नागपूरः** विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०१६-१७ पासून लागू करण्यात आली. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा करण्यात येते. नागपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्रामध्ये स्वाधार योजनेचे अर्ज केलेले आहेत व पहिला हप्ता अदा झालेला आहे अशा विद्यार्थ्यांनी दुसऱ्या हप्त्याची रक्कम मिळण्यासाठी उपस्थिती अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

# जुनाट मूत्रपिंड आजारग्रस्तांसाठी जीवनदायी ठरेल एआर इम्प्लांट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

विश्वेश्वरैया राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (व्हीएनआयटी), नागपूरच्या संशोधकांनी जुनाट मूत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त रुग्णांसाठी जीवनदायी ठरणारे एआर इम्प्लांट विकसित केले आहे. प्रसिद्ध नेफ्रोलॉजिस्ट डॉ. धनंजय ओकलकर यांच्या सहकार्याने ही अभिनव पद्धत तयार करण्यात आली.

शेवटच्या टप्प्यातील मूत्रपिंड रुग्णांसाठी हेमोडायलिसिस महत्त्वाचा उपचार मानला जातो, परंतु त्यासाठी आर्टिरिओव्हेनस फिस्टुला (एव्हीएफ) यशस्वी होणे अत्यावश्यक आहे. या समस्येवर तोडगा म्हणून मेकॅनिकल इंजिनीरिंग विभागाचे माजी संचालक आणि निवृत्त प्राध्यापक पी. एम. पडोळे, डॉ. एस. बी. ठोंबरे, डॉ. रश्मी उद्दनवाडीकर व डॉ. ओकलकर यांनी संयुक्तपणे संशोधन केले. विज्ञान-तंत्रज्ञान विभागाने प्रकल्पासाठी २६ लाख रुपये निधी मंजूर केला. पीएचडी संशोधक डॉ. अभिजीत राऊत यांनी धमनी-शिरा यांच्यातील योग्य कोन राखण्यासाठी जॅकेट प्रकारच्या इम्प्लांटची रचना केली. संगणक-सहाय्यित डिझाइन व संगणकीय द्रव गतिमानता चाचण्यांनंतर असे स्पष्ट झाले की लॅमिनार रक्तप्रवाहासाठी धमनी व शिरा यांच्यात ४५ अंशाचा कोन आदर्श आहे.

इम्प्लांट-ग्रेड सिलिकॉन पासून कॉम्प्रेशन मोल्डिंगद्वारे हे उपकरण तयार करण्यात आले. व्हीएनआयटीमध्ये इन विट्रो चाचण्या झाल्यानंतर सीसीएसईए, नवी दिल्लीची नैतिक मान्यता घेऊन माफसू, नागपूर येथे मोठ्या प्राण्यांवर शस्त्रक्रिया केल्या. एका गटात पारंपरिक पद्धती व दुसऱ्या गटात एआर इम्प्लांट वापरून एव्हीएफ तयार करण्यात आले. परिणामांनुसार, दाह कमी होणे आणि हायपरप्लासिया नियंत्रणात राहणे दिसून आले. हे उपकरण एव्हीएफ अपयश दर घटवू शकते, उपचारांचा यशदर वाढवू शकते आणि डायलिसिस प्रक्रियेला अधिक सुलभ करू शकते. मध्य भारतात प्रथमच मोठ्या प्राण्यांवर अशा प्रकारचे नैतिक मान्यतेसह संशोधन झाले. व्यावसायिकीकरणानंतर हे उत्पादन जगभरातील लाखो रुग्णांना जीवनदायी ठरेल. डॉ. प्रमोद पडोळे व डॉ. रश्मी उद्दनवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखालील हे संशोधन आंतरविद्याशाखीय समन्वयाचे अनुकरणीय उदाहरण ठरले आहे.

# श्रीरामने साकारला संघ शताब्दीचा देखावा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गणपती आरासीत वेगवेगळ्या सामाजिक आणि ऐतिहासिक विषयांवर देखावे साकारले जात आहेत. यंदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीनिमित्त महाल मुख्यालया जवळ राहणारे स्वयंसेवक श्रीराम जितेंद्र नागपूरकर यांनी संघ शाखेचा देखावा त्यांच्या घरी साकारला आहे.

या देखाव्यात साळुबाई मोहिते वाड्याच्या पार्श्वभूमीवर मोठ्या दरवाजासमोर भगवा ध्वज फडकताना दाखवण्यात आला असून, गणवेशातील स्वयंसेवक विविध कार्यक्रम सादर करताना दिसतात. श्रीरामने हा देखावा कार्डबोर्डसारख्या पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून साकारला आहे. 2025 या उपक्रमात त्याच्या आई पद्मा आणि वडील जितेंद्र यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# नोकरी मागणाऱ्या पेक्षा नोकरी देणारे बना

## नेहरू महाविद्यालयात जागतिक उद्योजकता दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २९ :

येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कौशल्य आणि उद्योजकता विकास समितीच्या अंतर्गत जागतिक उद्योजकता दिवस गुरुवार २१ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे आयक्युएसी समन्वयक डॉ. नरेंद्र घारड तर प्रमुख पाहूणे म्हणून निलेश लांजेवार, शैलेश थोराने, योगेश कुमकुमवार, आयोजिका डॉ. अर्चना देशमुख, मानव्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लीना फाटे, वाणिज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नभा कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. अर्चना देशमुख यांनी उद्योजकतेचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थ्यांना नोकरी मागणाऱ्यापेक्षा नोकरी देणारे बना असा संदेश दिला.




निलेश लांजेवार यांनी आपला स्वतःचा मार्ग निवडा या विचारातून विद्यार्थ्यांना लहान व्यवसायातूनही देशाच्या विकासात योगदान देता येते असे सांगितले. शैलेश थोराने यांनी यशस्वी व्यावसायिक उदाहरणे देत उद्योजकतेद्वारे समाजासाठी आधार बनता येते हे पटवून दिले. तर योगेश कुमकुमवार यांनी व्यवसायाचे मार्केटिंग कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात डॉ. नरेंद्र घारड यांनी प्रबळ इच्छाशक्तीतूनच यशाचा मार्ग निर्माण होतो, असे सांगत मन के जीते जीत है, मन के हारे हार या प्रेरणादायी ओळींद्वारे विद्यार्थ्यांना यशस्वी भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन प्रा. आकांक्षा बांगर यांनी तर आभार प्रा. शीतल बोंडे यांनी मानले. या वेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत मनपा संजयनगर शाळेचा संघ विजयी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नागपूर यांच्या वतीने शुक्रवारी (ता.29) हॉकीचे जादूगार खेलरत्न पद्मभूषण मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून जिल्हास्तरीय १४ वर्षांखालील मुलांची खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत नागपूर महानगरपालिकेच्या संजयनगर शाळेने विजेतेपद पटकावले आहे. अंतिम सामन्यात संजयनगर शाळेने आर. एस. मुंडले इंग्लिश स्कूलचा १०-८ अशा गुणांनी पराभव केला.



मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी,अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, उपायुक्त राजेश भगत, शिक्षणाधिकारी साधना सयाम, मनपाचे क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशीच मनपाचे क्रीडा अधिकारी डॉ. पियूष आंबुलकर, जिल्हा खो-खो संघटनेचे सहसचिव डॉ. पद्माकर चारमोडे आणि माजी आंतरराष्ट्रीय खो-खोपटू अश्फाक शेख यांनी स्पर्धेच्या ठिकाणी भेट देऊन सर्व खेळाडूंचे मनोबल वाढवले. स्पर्धेच्या समारोप कार्यक्रमात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या क्रीडा कार्यकारी अधिकारी दिपाली साबणे, महिला महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पराग बनसोले, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या श्रीमती सोनाली मोकासे या प्रामुख्याने उपस्थिती होती. या मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघाला गौरवण्यात आले.

विजेता संघ संजयनगर मनपा शाळेचे अभिनंदन करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका गीता दांडेकर, प्रशिक्षक वैभव कुंभारे, आणि व्यवस्थापक अशोक चौधरी यांनी खेळाडूंचे कौतुक केले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संपूर्ण स्पर्धेत संजयनगर मनपा शाळेने उत्कृष्ट कामगिरी केली. उपांत्य फेरीच्या सामन्यात त्यांनी शाहू गार्डन स्कूलचा १०-३ अशा मोठ्या फरकाने पराभव केला. त्याआधी, उपांत्यपूर्व फेरीत त्यांनी प्रेरणा कॉन्व्हेंट संघावर २ मिनिटे वेळ शिल्लक असताना ४-२ अशा गुणांनी विजय मिळवला, जो त्यांच्या जबरदस्त खेळाचा पुरावा ठरला.

# केदारनाथाच्या प्रतिकृतीत विराजमान झाले १३ फूट उंचीचे गणपती बाप्पा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे कॉलनी, मोतीबाग कामठी रोड येथील गणपती सेना उत्सव मंडळा तर्फे यावर्षी उत्तराखंडातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या ऐतिहासिक केदारनाथ मंदिराची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. या पांडालामध्ये १३ फूट उंचीची गणेशजींची भव्य मूर्ती स्थापित करण्यात आली आहे.

गणपती सेना उत्सव मंडळ दरवर्षी भारतातील विविध भागांतील ऐतिहासिक वास्तूंच्या प्रतिकृती साकारून समाजासमोर सादर करते. यंदाच्या ऐतिहासिक पांडालाचे उद्घाटन दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर मंडळाचे मंडल रेल्वे व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता सहपरिवार, गुरुनानक इन्स्टिट्यूट्स चे उटऊ सरदार नवनीतसिंह तुली, बी.एस.एन. मूर्ती तसेच नॅचुरोपॅथी व नियोथेरपिस्ट डॉ. प्रवीण डबली यांच्या हस्ते पूजा-अर्चना करून करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख यजमान एम. प्रभाकर राव सहपरिवार यांनी गणेशजींची आरती केली. पूजा विधी पंडित राजेश त्रिवेदी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे.

या प्रसंगी सर्व मान्यवरांचा पुष्पहार, शाल, दुपट्टा व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मंडळाकडून कळविण्यात आले की, १० दिवसीय गणेशोत्सव काळात आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर तसेच मुलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे.

केदारनाथ प्रतिकृती पांडालात दररोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी उपस्थित राहत आहेत. आयोजकांनी सर्व नागरिकांना बाप्पांचे दर्शन घेऊन आशीर्वाद मिळविण्याचे आवाहन केले आहे.

या वेळी मंडळ अध्यक्ष दीपांकर पाल, सचिव जी.एन. पटनायक, आय. वेंकटरमन, अक्षय नायक, रमेश पटनायक, राजेश रामटेके, टी. विजयकुमार, सी. प्रकाशराव, रामकृष्ण पटनायक, मर्फी हरडे, राज घुघुसकर, गुरबचनसिंह खोखर, राजू यादव, पवन गुप्ता, सुशील यादव, शोभित हरडे, राकेश पंचबुधे, एम. उमेश राव, साईकुमार, सी. सागर, एम. वेंकटेश, राज साहू, मनोज पटनायक, विमलकुमार यांच्यासह मंडळाचे अन्य सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कारने ड्रग्जची विक्री करणारा गजाआड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

शहरभरात कारने फिरून अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका आरोपीला गुन्हे शाखेच्या एनडीपीएस पथकाने सापळा रचून अटक केली. पोलिसांना त्याच्याजवळ ५५ ग्रॅम एमडी पावडर मिळाला. पोलिसांनी त्याच्याकडून कार आणि ड्रग्जसह एकूण ८९.३७ लाखांचा माल जप्त केला. सूरज भीम कोसरे (२४) रा. श्रावणनगर, वाठोडा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

पोलिसांकडून ऑपरेशन थंडर अंतर्गत सातत्याने अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू आहे. वाठोडा ठाण्यांतर्गत स्वामी नारायण मंदिरामागील श्रावणनगरात एक युवक अंमली पदार्थांची विक्री करीत असल्याची माहिती बुधवारी रात्री १० वाजताच्या सुमारास पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी त्याला पकडण्यासाठी परिसरात सापळा रचला. जय बजरंग किराणा स्टोअरजवळ पोलिसांना सूरज सांगण्यात आलेल्या नंबरच्या कारजवळ संशयितरित्या उभा दिसला.

पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन पंचासमोर झडती घेतली असता एका जिपलॉक पिशवित ५५ ग्रॅम एमडी पावडर मिळाले. पोलिसांनी त्याच्याकडून ड्रग्ज, कार आणि मोबाईलसह एकूण ८९ लाख ३७ हजार रुपयांचा माल जप्त केला. चौकशीदरम्यान सूरजने सांगितले की, त्याला चैतन्यश्वरनगर परिसरात राहणारा आशिष दिलीप काळे (३२) नावाचा तरुण मालाचा पुरवठा करतो. तो आशिषसाठी कमिशनवर अंमली पदार्थ विकण्याचे काम करतो. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध वाठोडा ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आशिषचा शोध सुरू आहे. ही कारवाई वपोनि गजानन गुल्हाने, पोउपनि नागेश पुन्नावाड, पोहवा पवन गजभिये, अरविंद गेडेकर, विवेक अढाऊ, मनोज नेवारे, अनूप यादव आणि राहुल पाटील यांनी केली.

# पुन्हा सुरू झाले खासगी बसेसचे थांबे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

पोलिस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल आणि वाहतूक शाखेचे उपायुक्त लोहित मतानी यांनी खाजगी बसेसवर घातलेल्या बंदीमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. अग्याराम देवी चौक, एसटी स्टँड, मॉडेल मिल रोड, डालडा कंपनी चौक, कृपलानी चौक आणि छत्रपती चौक येथील बस थांबे बंद झाल्याने वाहतूक सुरळीत झाली.

१४ ऑगस्टपासून पोलिसांनी बसेसवर लगाम कसण्यास सुरुवात केली होती आणि सूचनांचे पालन न करणाऱ्या बस चालकांवर कारवाईही करण्यात आली. आठवडाभर सर्व काही सुरळीत चालले. मात्र ट्रॅव्हल्स चालक पुन्हा हळूहळू पाय पसरू लागले आहेत.

आता बस थांबे पुन्हा सुरू झाले आहेत. जणू स्थानिक बस चालकांनी पोलिसांच्या निर्देशांना केराची टोपली दाखवली आहे. हे थांबे पूर्वीसारखे सुरू नाही. मात्र काही ट्रॅव्हल्स चालकांनी पुन्हा एकदा सेटिंग केल्याचे दिसून येत आहे.

एसटी बस स्थानकाच्या २०० मीटर अंतरात कोणतीही खाजगी बस थांबणार नाही किंवा प्रवासी उचलणार नाही, असे उच्च न्यायालयाने कडक निर्देश दिले होते. परंतु आता ट्रॅव्हल संचालकांनी पुन्हा मनमानी करायला सुरुवात केली आहे. काही लोकांनी त्यांचे मार्ग बदलले आहेत. परंतु शहरातील रस्त्यांवर अजूनही बसेस थांबवल्या जात आहेत.

असे दिसते की स्थानिक बस संचालक पोलिसांना अजिबात महत्त्व देत नाही. छत्रपती चौकात नगररे बंधू, हिंदुस्तान ट्रॅव्हल्स, माँ दुर्गा, रिद्धी, ओमसाई, श्री साई यांच्या बसेस अजूनही रस्त्यावर उभ्या दिसतात. चंद्रपूर, यवतमाळ आणि वर्धा येथे जाणाऱ्या बसेस अजूनही विविध ठिकाणी थांबून प्रवासी उचलत आहेत. तर, गडचिरोलीला जाणाऱ्या बसेसही उमरेड रोडवर सक्करदराजवळ थांबत आहेत.

# ट्रॅव्हल्सची दुचाकीला धडक, २ जखमी

**नागपूर :** ट्रॅव्हल्स बसच्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वाहन चालवत दुचाकीस्वार दोघांना जबर धडक देऊन काही अंतरापर्यंत फरफटत नेले. यात दुचाकीस्वार दोघेही गंभीर जखमी झाले. या घटनेने परिसरातील नागरिकांमध्ये रोष पसरला. संतप्त जमावाने बस चालकाला पकडून चांगला चोप दिला. ही घटना गुरूवारी सकाळी दिघोरी नाकाजवळ घडली. गुलाबराव चैतराम ठाकरे (६०) आणि भीमराव राऊत दोन्ही रा. उंबरगाव, उमरेड अशी जखमींची नावे असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हुडकेश्वर पोलिसांनी आरोपी ट्रॅव्हल्स चालक रुपेश कोंडूजी शिवरकर (३७) रा. चिमूर, चंद्रपूरविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरूवारी सकाळच्या सुमारास गुलाबराव आणि भीमराव एमएच-४०/बीएन-६४२१ क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने उमरेडकडे जात होते.

दिघोरी नाकाजवळ उमरेडकडून नागपूरकडे येत असलेल्या ट्रॅव्हल्स बस क्र. एमएच-३१/एफसी-३५४५ चा चालक रुपेश याने निष्काळजीपणे व भरधाव वाहन चालवत त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. या दरम्यान दुचाकी बसच्या पुढच्या भागात अडकल्याने दोघेही वाहनासह बऱ्याच अंतरापर्यंत फरफटत जाऊन जखमी झाले.

गुलाबराव यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, तर भीमराव यांचा पाय फ्रॅक्चर झाला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली. आसपासचे नागरिक गोळा झाले.



श्री बाल गणेश उत्सव मंडळ किनखेडे लेआऊट जामदार वाडी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन



भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा अध्यक्ष मनीषा लंगडे कळमेश्वर शहर यांच्या कडील गणपती



आमदार डॉ.आशिषराव देशमूख सावनेर विधानसभा क्षेत्र यांच्या निवास्थान येथील गणपती बाप्पा

# पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाला गणेशभक्तांचा चांगला प्रतिसाद

## शहरात विविध ठिकाणी मनपाचे उभारले पर्यावरणपूरक विसर्जन कुंड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करताना श्री गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे शहरातील विविध भागात कृत्रिम विसर्जन कुंडांची व्यवस्था करण्यात आली आहे. नागपूर महानगरपालिकेने घेतलेल्या या पर्यावरणपूरक पुढाकाराला गणेशभक्त देखील चांगला प्रतिसाद देत आहेत. शहरात ठिकठिकाणी असलेल्या कृत्रिम तलावांमध्ये पहिल्याच दिवशी मोठ्या प्रमाणात गणेश मूर्तींचे विसर्जन करीत गणपती बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी. आणि अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांच्या मार्गदर्शनात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत श्रीगणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी शहरातील २१६ ठिकाणी ४१९ कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे.

एक दिवसीय व दीड दिवसीय गणेश विसर्जनासाठी शहरात ३४ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली. यामध्ये लक्ष्मीनगर झोन येथे ३ ठिकाणी, धरमपेठ झोन येथे ७ ठिकाणी, हनुमाननगर झोन येथे २ ठिकाणी आणि धंतोली झोन, नेहरूनगर झोन व सतरंजीपुरा झोन येथे प्रत्येकी एका ठिकाणी अशा एकूण ५ ठिकाणी ३४ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली. शिवाय महानगरपालिकेतर्फे निर्माल्य गोळा करण्याकरीता निर्माल्य कलश सुद्धा कृत्रिम तलावाजवळ ठेवले आहेत.

नागरिकांनी कृत्रिम तलावातच गणेश मूर्तीचे विसर्जन करावे आणि निर्माल्य कलशातच निर्माल्य दान करावे, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, मनपाच्या मदतीला स्वयंसेवी संस्था तैनात आहेत. ग्रीन व्हिजिल फाउंडेशनचे कौस्तुभ चॅटर्जी यांच्यासह कु. सुरभी जयस्वाल व चमू फुटाळा तलाव परिसरात आपली सेवा देत आहे. अनंत चतुर्दशी पर्यंत स्वयंसेवी संस्था दररोज आपली सेवा देणार आहे.

गुरुवारी दीड दिवसाच्या गणपतीचे या कृत्रिम तलावांमध्ये आतापर्यंत मोठ्या प्रमाणात घरगुती गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले आहे. यावेळी नागपूर महानगरपालिकेने गणपती विसर्जनाकरीता कृत्रिम तलाव उपलब्ध करून दिल्याने मनपाने घेतलेल्या पुढाकारावर गणेश भक्तांनी समाधान व्यक्त करीत महानगरपालिकेची प्रशंसा केली.

यावेळी गणपती विसर्जनासाठी आलेल्या माया संगवई म्हणाल्या की, नागपूर महानगरपालिकेतर्फे गणपती विसर्जनासाठी उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. प्रत्येकांनी पर्यावरण संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. गणपतीचे विसर्जन नद्या, तलावात करण्यापेक्षा महानगरपालिकेने तयार केलेल्या कृत्रिम तलावात करावी. तर आशय भाकरे म्हणाले की, सोनेगाव तलाव येथे नागपूर महानगरपालिकेतर्फे कृत्रिम तलावाची अशी उत्तम व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. विसर्जनाच्या वेळी नैसर्गिक जलाशयला होणाऱ्या हानीपासून कृत्रिम तलावाच्या सुविधामुळे संरक्षण मिळत असल्याने त्यांनी महानगरपालिकेच्या कामाची प्रशंसा केली. यावेळी प्राची डोंगरे म्हणाल्या की, नागपूर महानगरपालिकेने गणपती विसर्जनाकरिता उत्तम असे कृत्रिम तलाव तयार करून चांगले काम केले आहे. यामुळे तलाव प्रदूषित होणार नाही.

अमित रंगारी यांनी सांगितले की, यापूर्वी गणपती विसर्जनामुळे तलावात प्रदुषण होत असे. परंतु, आता नागपूर महानगरपालिकेने गणपती विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची सुविधा उपलब्ध करून दिल्याने तलावातील प्रदूषण कमी होणार आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने स्वागतर्ह पाउल उचलले आहे.

# ५ लाखांच्या मुद्देमालासह चोरट्याला अटक



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

आजारी आईसोबत रूग्णालयात थांबलेल्या मुलीच्या घरात चोरट्याने सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह 5 लाख 53 हजार रुपयांच्या मुद्देमालावर डल्ला मारला होता. या चोरट्याला पोलिसांनी अटक केली. यश मनोज निमजे (22, गोळीबार चौक, पटवी गल्ली, तहसील) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, स्वामी कॉलोनी, नंबर 1, आकारनगर येथे माहेश्वरी मारोती येवले (21) राहते. तिच्या आईची प्रकृती ठिक नसल्याने त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रुग्णालयात आईच्या मदतीसाठी माहेश्वरी ही गत रविवारी गेली होती आणि तिथेच रात्री थांबली. चोरट्यांनी माहेश्वरीच्या घराच्या दाराचे कुलूप तोडून घरातील बेडरूममधील आलमारीत सोन्याचे-चांदीचे दागिने ठेवले होते. या प्रकरणी माहेश्वरी हिने दिलेल्या तक्रारीवरून गिट्टीखदान पोलिसांनी अज्ञात आरोपीविरूद्ध कलम 305 (अ), 331(3), 331 (4) भान्यासं अन्वये गुन्हा दाखल केला.

# नागपूरात सम्राट अशोक यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणार

## ॲड. महेंद्र बनसोड यांचा संकल्प

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

बनसोड मित्र परिवार संघटनेचे संघटक, सम्राट अशोक सहकारी बँक चे अध्यक्ष ॲड. महेंद्र बनसोड यांच्या 50व्या वाढदिवसाच्या निमित्ताने बनसोड मित्र परिवार संघटना, सम्राट अशोक सहकारी बँक व बारसेनगर पाचपावली मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रीन आरेंज सेलिब्रेशन सभागृह येथे एड्. महेंद्र बनसोड यांचा नागरिक सत्कार करण्यात आला.



नागपूर जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्कार सोहळ्यात आवाज इंडिया टी. व्ही. चे संचालक अमन कांबळे, नागपूर जिल्हा सहकार संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र घटे, प्रा. योगेश मुनेश्वर यांच्या प्रमुख उपस्थितीत महेंद्र बनसोड व त्यांच्या सहचारिणी शिल्पा यांचा शाल, पुष्पगुच्छ, सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी वक्त्यानी महेंद्र बनसोड यांनी सामाजिक, आंबेडकरी चळवळ, सहकार क्षेत्रात व वकील म्हणून लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेले कार्याचा आढावा घेऊन मुक्त कंठाने गौरव केला.

आपल्या सत्काराला उत्तर देतांना ॲड. बनसोड यांनी सत्कार केल्याबद्दल आभार म्हणून हा सत्कार माझ्या परिवाराने केलेले योग्य संस्कार व त्यांनी मला सुजाण नागरिक घडवून समाजाप्रती सेवाव्रतीची शिकवण यामुळे मी आज समाजात कार्यरत आहे. नागपूर शहरात महापुरुषांचे मोठ्या प्रमाणात पुतळे व स्मारक आहेत परन्तु सम्राट अशोक यांच्या कार्याचा विसर झाल्याचे दिसते. शहरात कुठेही त्यांचा पुतळा किंवा स्मारक नाही.सम्राट अशोक यांचे विचार रुजविण्यासाठी नागपूर शहरात शासकीय जागेवर रितसर परवानगी घेऊन पुणार्कृती पुतळा येत्या वर्षभरात बैकेच्या सहकायार्ने उभारण्याचा संकल्प आपल्या भाषनातून व्यक्त करून बनसोड यांनी हा पुतळा शोभेचे ठरू न देता त्यांचे विचार जनमानसात रुजवण्यासाठी प्रचार व प्रसार करण्याचा मानस बनसोड यांनी व्यक्त केला.

सत्कार सोहळ्याचे प्रास्ताविक बनसोड मित्र परिवार संघटनेचे अध्यक्ष धर्मेंद्र बनसोड यांनी केले. संचालन उमेश वाघमारे व शांताराम रंगारी यांनी तर आभार शशिकुमार कांबळे यांनी केले. कार्यक्रमला रमेश फुले, ॲड. बी. जी. गजभिये, डॉ. संजय चौधरी, प्रा. वर्षा बनसोड, चंद्रशेखर सोनटक्के, लियाकत अली, भगवान वाहने, महेंद्र भांगे, तुषार शेंडे,यशवंत ठाकरे रायपूर, कविवर्य सूर्यभान शेंडे, प्रा. सुरेश पानतावणे, सि.एम. चव्हाण, प्रा. नन्दा भगत, सुनीता शेन्डे, परमानंद बनसोड, मधुकर ढोके, स्वेता ठाकरे ओरिसा, नितीन डेकाटे मुंबई, विजय गजभिये, प्रभाकर पानतावणे, सचिन बनसोड भन्डारा, विरेंद्र मेश्राम, विजय रामटेके, दर्शना बनसोड, डॉ. विधिका बनसोड, अरविंद बनसोड आदिसह सामाजिक, राजकीय, सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते, बौद्ध विहार समितीचे उपासक, सम्राट अशोक सहकारी बँकेचे भागधारक, बनसोड मित्र परिवारातील सदस्य, वकील संघटनाचे सदस्य व बनसोड यांचा चाहता वर्ग पावसाची तमा न बाळगता हजर होता.

महासागर प्रभाग वार्ता

# गुरुनानक फार्मसी कॉलेज रोडवर मोठा खड्डा

## अपघाताची भीती, नागरिकांत संताप

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि. २९

प्रभाग क्र. २ मधील काशी नगर परिसरातील गुरुनानक फार्मसी कॉलेजकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर सडक खचून भला मोठा खड्डा निर्माण झाला आहे. या मार्गावर मुस्लिम कब्रस्तान असून परिसरातील नागरिक, कॉलेजचे विद्यार्थी आणि सर्वसामान्य वाहतूकदार यांचा या मार्गावरून नेहमीच वावर असतो. मात्र रस्त्यावरील खड्ड्यामुळे सध्या अपघात होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे.दुचाकीवर असलेल्यांना पडण्याचा धोका जास्त आहे रात्रीच्या वेळी किंवा पावसात खड्डा न दिसल्याने जीवघेणा अपघात होवू शकतो.



स्थानिक नागरिक सतीश पाली यांनी सांगितले की, झोनचे सहआयुक्त हरीश राऊत यांना याबाबत माहिती देण्यात आली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. भागवत यादव म्हणाले की, वस्तीतील नागरिकांनी अनेकवेळा रस्ता दुरुस्त करण्यासाठी प्रशासनाकडे तक्रारी केल्या, परंतु अजूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे.

अपघात झाल्यास संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.स्थानिक नागरिक अनिल कोटांगळे, निलेश जनबंधू, भुरू यादव, नरेश ठाकूर, पप्पू शाहू, टिंकू कांबळे, अनिरुद्ध गणवीर, राजेश पांडे, देवा सहारे यांनी तात्काळ रस्ता दुरुस्त करून सिमेंटिकरण करण्याची मागणी केली आहे.